■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी  एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.R.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ३२ ● मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

■ केंद्र सरकारच्या निर्देशानुसार आयोजन; ‘सडक सुरक्षा, जीवन रक्षा’ ही संकल्पना ■

# राज्यभर १ ते ३१ जानेवारी दरम्यान ‘रस्ता सुरक्षा अभियान’

**मुंबई, दि. ३० : रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यभर १ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत केंद्र सरकारच्या निर्देशानुसार राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना हे अभियान साजरे करण्यात येणार आहे. यानिमित्ताने संपूर्ण राज्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.**

या रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत परिवहन विभाग, वाहतूक पोलीस विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच इतर संबंधित संस्था व संघटनांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षिततेसाठी प्रचार, जनजागृती व जनप्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित घटकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (एमओरटीएच) यांच्या मार्गदर्शनानुसार या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, वाहनचालक व शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती सत्रे, नेत्र तपासणी शिबिर तसेच विविध प्रचारात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यावर्षीच्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याची संकल्पना ‘सडक सुरक्षा ह्र जीवन रक्षा’ अशी असून रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाच्या जीवनरक्षणाशी निगडित आहे, हा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या अभियानामुळे रस्ता सुरक्षा नियमांचे पालन वाढेल आणि अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास परिवहन आयुक्त, मुंबई यांनी व्यक्त केला आहे.

## मोटार वाहनधारकांसाठी दिलासा : आरटीओचा मासिक शिबीर दौरा

वाशिम,दि.३० (जिमाका) जिल्ह्यातील मोटार वाहन चालक व वाहन मालक यांच्या सोयीसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम यांच्या वतीने मोटार वाहन निरीक्षकांचा मासिक शिबीर दौरा आयोजित करण्यात आला आहे.

या शिबिरांमध्ये वाहन कर वसुली, मोटार वाहन नोंदणी, वाहन तपासणी तसेच वाहन चालक अनुज्ञप्ती संबंधित कामकाज करण्यात येणार असून सदर शिबिरांमध्ये सारथी प्रणालीवरून ऑनलाईन अपॉइंटमेंट घेतलेले अर्जच स्वीकारले जाणार आहेत. जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत कारंजा, रिसोड, मानोरा व मंगरुळपीर या तालुक्यांमध्ये ठराविक तारखांना शिबीर घेण्यात येणार असून जानेवारी महिन्यात ५, ९, १५, १९ व २७, फेब्रुवारी महिन्यात ४, १२, १६, २० व २५, मार्च महिन्यात ५, ९, १६, २० व २५, एप्रिल महिन्यात ६, १०, १६, २२ व २७, मे महिन्यात ४, ११, १५, २२ व २६ तसेच जून महिन्यात ५, ११, १७, २३ व २९ रोजी शिबीर आयोजित करण्यात येणार आहे.

उपरोक्त तारखेस शासकीय सुट्टी जाहीर झाल्यास शिबीर पुढील कार्यदिवशी घेण्यात येईल तसेच अर्ज स्वीकारण्याची वेळ सकाळी ९.४५ ते दुपारी २ वाजेपर्यंत राहील, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप यांनी दिली आहे.

## सैनिक कल्याण विभागातील लिपिक टंकलेखक (गट–क) भरतीसाठी अर्जाची मुदत ९ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ

वाशिम,दि.३० डिसेंबर (जिमाका) सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सरळसेवेतील लिपिक टंकलेखक (गट-क) पदांच्या भरतीसाठी जाहिरात दि. १२ ऑक्टोबर २०२५ व शुद्धीपत्रक दि. ७ डिसेंबर २०२५ नुसार अर्जदारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी विभागाच्या संकेतस्थळावर वेब लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. मात्र, तांत्रिक कारणांमुळे सैनिक कल्याण विभागाचे संकेतस्थळ २६ डिसेंबर २०२५ पासून निष्क्रिय झाल्याने इच्छुक उमेदवारांना संबंधित वेब लिंकपर्यंत पोहोचणे शक्य झाले नाही. या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या सोयीसाठी खालील Web Link तसेच QR Code चा वापर करून ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच, उमेदवारांना ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठीची अंतिम मुदत ९ जानेवारी २०२६ रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. ऑनलाईन अर्जासाठी वेब लिंक : https://cdn3.digialm.com/EForms/configuredHtml/32786/96173/Index.html अर्ज प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण आल्यास dswpune@gmail.com या ई-मेल पत्त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विश्वनाथ घुगे यांनी केले आहे.

# ‘आपला पैसा आपला अधिकार’ : दावा न केलेल्या संपत्तीच्या वितरणासाठी विशेष शिबिराला उत्स्फूर्त प्रारंभ

■ हक्काचा पैसा नागरिकांच्या दारात ;प्रोॲक्टिव्ह गव्हर्नन्सचे प्रभावी उदाहरण – जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर ■

**वाशिम,दि.२९ डिसेंबर (जिमाका) – हक्क न सांगितलेल्या संपत्तीच्या वितरणासाठी आजचे विशेष शिबिराच्या माध्यमातून प्रशासन स्वतः नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांचा हक्काचा पैसा मिळवून देत आहे, हे प्रोॲक्टिव्ह गव्हर्नन्सचे प्रभावी उदाहरण आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**

आर्थिक क्षेत्रातील दावा न केलेल्या मालमत्तेचे कार्यक्षम व जलद वितरण करण्यासाठी आयोजित विशेष मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय (भारत सरकार) यांच्या पुढाकाराने हॉटेल दानीश एम्पायर येथे या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी योगेश क्षिरसागर, आरसेटी संचालक धनाजी बोईले, नागपूर आरबीआयचे प्रबंधक महेश थूल, एसबीआय मुख्य शाखेचे प्रबंधक मोहित कुमार यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी, खातेदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले,अनेक वर्षांपासून बँकेत पडून असलेल्या निधीच्या अनुषंगाने हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, आरबीआयच्या ध्येय-धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, यासाठी जिल्हा अग्रणी बँक महत्त्वाची भूमिका बजावत आहे.या उपक्रमात इतर बँकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. तसेच अटल पेन्शन योजना, जीवन ज्योती विमा योजना यांसारख्या केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना मिळत असून, पात्र नागरिकांनी त्यांचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. नागरिकांची आर्थिक साक्षरता वाढावी यासाठी अशा प्रकारची शिबिरे सातत्याने आयोजित करावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शिबिराला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी उपस्थितांचे विशेष कौतुक केले. शिबिराचे प्रास्ताविक एलडीएम यशवीर कुमार यांनी केले. त्यांनी शिबिराची सविस्तर माहिती देताना सांगितले की, जिल्ह्यातील सुमारे १८ कोटी रुपयांची दावा न केलेली संपत्ती आरबीआयकडे जमा आहे.




आजच्या शिबीरात १५७ खातेदारांना १.२३ कोटी रुपये रक्कम आतापर्यंत वितरित करण्यात आली असून जवळपास १६.७० कोटी रुपये रक्कम अजून आरबीयकडे जमा आहे. संबंधित बँक खात्यांची यादी बँकांच्या नोटीस बोर्डवर तसेच ग्रामपंचायत स्तरावर अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांनी ही माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी पंकज दिवनाले यांनी मनोगत व्यक्त करत, या विशेष शिबिरासाठी बँकांनी पुढाकार घेऊन व्यापक जनजागृती केल्याचे नमूद केले. जिल्हाधिकारी श्री.कुंभेजकर यांनी विविध बँकांच्या स्टॉलला भेट देत पाहणी केली. शिबिराच्या निमित्ताने बँकांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी एसबीआय प्रबंधक मोहित कुमार यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत, दावा न केलेल्या संपत्तीबाबत प्रक्रिया, नियम व नागरिकांचे हक्क यांची सविस्तर माहिती दिली.



# नारळ लागवडीतून कोकणच्या अर्थव्यवस्थेला बळ

जगामध्ये जवळजवळ ९३ देश नारळाचे उत्पादन घेतात. आपल्या महाराष्ट्र राज्यात नारळ उत्पादनाचा विचार करता राज्यात ३३ हजार हेक्टरवर नारळाचे लागवडीखाली क्षेत्र असून १७ हजार ९२९ हेक्टर सर्वाधिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे, तर कोकणात दरवर्षी अंदाजे नारळाचे रुपये १८.६३ कोटींचे उत्पादन होत असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुपये १ हजार ४५७ लाख नारळाचे उत्पादन होत असते. ही माहिती प्रादेशिक नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. किरण मालशे यांनी २०२३ साली दिली होती. म्हणजे अजून चांगल्या प्रकारे नारळाची लागवड केल्यास नारळाच्या उत्पादनात वाढ होऊन कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल.

आज नारळाचा विचार केल्यास नारळाच्या उत्पादनात घट होऊन नारळाच्या किमती जवळजवळ तिप्पट झालेल्या दिसत आहेत. तर नारळाच्या तेलाची किंमत रुपये ६०० प्रति लिटर झाली आहे. याला कारण रोगराई, बदलते हवामान, अपुरे पाणी आणि माकडांचा वावर होय. असे असले तरी कोकणात चांगले नारळाचे उत्पादन होते. तेव्हा नारळ उत्पादनाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिल्यास उत्तम प्रकारे बळ कोकणच्या अर्थव्यवस्थेला मिळू शकते. त्यासाठी योग्य प्रकारे नारळाची लागवड करायला हवी. म्हणजे नारळाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे कोकणच्या उत्पन्नात अधिक चांगल्याप्रकारे वाढ होऊ शकते. तेव्हा नारळ कितीही महाग झाला तरी कोकणी माणूस खोबऱ्याशिवाय जेवण करीत नाही. नारळाचा विचार केल्यास अनेक लोकांचा संसार नारळाच्या व्यवसायावर अवलंबून असतो. सध्यातरी हा व्यवसाय कोकणात शेतकऱ्यांचा पूरक जोडधंदा म्हणून ओळखला जातो. काही शेतकरी शेतीच्या बाजूने नारळाची रोपे लावतात. काहींची तर नारळाची स्वतंत्र बाग आहे. एक माड जरी असला तरी त्याचा अनेक प्रकारे उपयोग होऊ शकतो. तेव्हा नारळाच्या व्यवसायामुळे अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यासाठी नारळाची अधिक प्रमाणात लागवड करणे गरजेचे आहे. आपण नारळ जरी म्हणालो असलो तरी त्याच्या विविध भागांचा उपयोग नागरिकांच्या उपयोगासाठी होत असतो. त्यामुळे नारळाच्या झाडाला 'कल्पवृक्ष' म्हणतात. असे आपण प्राथमिक शाळेत शिकलो आहोत. तेव्हा नारळाच्या झाडाचे योग्य प्रकारे संगोपन आपल्याला करावे लागेल. कारण त्याच्या प्रत्येक भागाचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. आता आपण नारळाच्या झाडांच्या विविध भागांचा उपयोग कसा केला जातो किंवा नागरिकांना होतो याविषयी माहिती घेऊ. त्यामुळे नारळाच्या झाडाला खऱ्या अर्थाने कल्पवृक्ष म्हणतात हे वाचक वर्गाच्या लक्षात येईल. घाटमाथ्यावर आवडीने शेंगदाणे जेवणात वापरतात त्याप्रमाणे कोकणात ओल्या खोबऱ्याचा जेवणात वापर केला जातो. कोवळ्या नारळाचे पाणी लोक आवडीने पितात. कोकणात त्याला शहाळे असेही म्हणतात. खोबऱ्यापासून तेल व दुधसुद्धा तयार करतात. तेल काढल्याने सुखी पेंडसुद्धा मिळते. करवंटीचा वापर डवली व कोळशासाठी केला जातो. नारळ सोलल्यानंतर त्यांची सोडणा मिळतात ती पाण्यात फुगत घातली जातात. त्यानंतर त्याचा काथ्या तयार केला जातो. त्यापासून दोरी, ब्रश, जाळी, चटई इत्यादी वस्तू तयार केले जातात. नारळाच्या पानापासून सुंदर छप्पर किंवा जाळी बनवली जातात. त्याच्या हिरापासून झाडू बनवितात. हिराच्या झाडूलासुद्धा बाजार पेठेत बऱ्यापैकी मागणी असते.

# वातावरणातील बदल; अनेकांना सर्दी, खोकल्यासह घसादुखी



**मालेगांव :** गत काही दिवसांपासून वातवरणात होत असलेल्या बदलांचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. परिणामी शहरासह तालुक्यात सर्दी खोकला, घसा दुखणे आदी रुग्णाच्या संख्येत वाढ झाली आहे.

सध्या रुग्णालयासह रुग्णालयात ग्रामीण खासगी याबाबतची तपासणी करण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची चांगलीच वाढ झाल्याचे दिसून येत आहे. दरम्यान सर्दी, खोकल्याची लक्षणे एखाद्या व्यक्तीत आढळून आल्यास त्वरित डॉक्टरांकडे तपासणीसाठी जावे असे, आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. सध्या अचानक होत असलेल्या वातावरणातील बदलामुळे नागरिकांची चिंता वाढलं आहे. लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनाच सर्दी खोकला ताप यांचा त्रास सुरु झाला आहे. विशेष म्हणजे वातावरणाच्या बदलामुळं सगळीकडे सर्दी, खोकल्याचं साथ मोठ्या प्रमाणात पसरल आहे. यात सर्दी-खोकल्याच आजार आणि घसा दुखणे य रुग्णांमध्ये आठवड्यापेक्षाहं जास्त दिवस राहत असल्याचं दिसून आले आहे. डॉक्टर तपासणसाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये सर्वाधिक रुग्ण सर्दी खोकल्याची असल्याचं माहिती डॉक्टरांनी दिली वातावरणातील बदल आणि हवेतील प्रदूषणामुळे गत काई दिवसांत सर्दी, खोकला आणि घसा दुखणे आदी रुग्णांच्य संख्येत काही दिवसांपासून वाढ झाली आहे.

## काय काळजी घ्याल



◆ काळजी घ्यावी याबाबत सांगताना डॉ. सतीश घुगे म्हणाले की, रुग्णांनी व सर्वच नागरिकांनी थंडीमध्ये शरीर उबदार ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यासाठी उबदार कपड्यांचा वापर करावा. अर्ली मॉर्निंग म्हणजेच सकाळी लवकर थंडीच्या कालावधीत व्यायामासारख्या ॲक्टिव्हिटी करणे टाळावे. हायपर टेन्शन, ब्लड प्रेशर, कोलेस्ट्रॉलची पातळी अधिक असणारे रुग्ण अशा सर्वांनी त्यांना सुरू असलेली सर्व औषधे नियमित, वेळेवर घ्यावीत. छातीत दुखण्याकडे दुर्लक्ष करू नका, ब्लड प्रेशरची नियमित औषधे बंद करू नका, भरपूर पाणी प्या, हृदयरोग असणा-या रुग्णांनी तापाचे लसीकरण करून घ्यावे, ब्लड प्रेशर व शुगर नियमित तपासावी. कोणत्याही प्रकारची लक्षणे दिसून आल्यास तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधावा.

# पुसद नाका उड्डाणपूल सर्व्हिस रोड बांधकामाच्या नियोजनाची जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी

**वाशिम,दि.२९ डिसेंबर (जिमाका)वाशिम शहरातील पुसद नाका परिसरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजुस असलेल्या सर्व्हिस रोडच्या बांधकामाच्या नियोजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली. या पाहणीदरम्यान कामांचे नियोजन, दर्जा तसेच वाहतूक व्यवस्थेवर होणारा परिणाम याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.**



यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप, सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपविभागीय अभियंता संचित शिंदे, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नाईक तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत विभागाचे कनिष्ठ अभियंता सरोदे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी कामाच्या गुणवत्तेबाबत काटेकोर दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत वाहतूक सुरळीत राहील यासाठी योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले.

तसेच कामे वेळेत व नियोजित पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# उन्हाळी पीक घेऊ नका!, प्रकल्पात पाण्याचा साठा कमी असल्याने पिके वाळण्याची शक्यता?

## अडोळ प्रकल्पावरील लाभधारकांना जलसंपदा विभागाचे आवाहन



**रिसोड** - वाशिम जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या वतीने अडोळ प्रकल्पावरील सर्व लाभधारक शेतकरी व नागरिकांना आवाहन आले की, मालेगाव तालुक्यातील अडोळ प्रकल्पातील सद्यस्थितीतील जिवंत पाणी साठा केवळ ५१.०९ टक्के इतकाच उपलब्ध आहे.
अडोळ प्रकल्पावरून बिगर सिंचन पिण्याच्या पाण्याचे आरक्षण असल्यामुळे कोणत्याही शेतकऱ्यांनी उन्हाळी पिके घेऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश अडोळ प्रकल्पावरील लाभधारकांना जलसंपदा विभागाकडून देण्यात आले आहेत. चालू असलेला हा रब्बी हंगाम संपताच अडोळ धरणावरील सर्व विद्युत कनेक्शन कट करण्यात येणार असल्याने पाणी पुरवठा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये. हा त्या मागचा उद्देश असून वृत्तपत्रातून शेतकऱ्यांना सजगतेचा इशारा देण्यात येत आहे. तसेच, कोणत्याही प्रकारचा अनधिकृत किंवा बेकायदेशीर पाणी उपसा करण्यास सक्त मनाई करण्यात येत असून , नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. असे कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे अडोळ प्रकल्पावरील सर्व लाभधारकांनी कोणत्याही परिस्थितीत उन्हाळी पिके (२०२६ मध्ये ) घेऊ नयेत या सूचनांकडे दुर्लक्ष करून पिके घेतल्यास होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस कोणतेही कार्यालय किंवा अधिकारी जबाबदार राहणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. असे आवाहन कालवा निरीक्षक गोपाल शिंदे पाटबंधारे शाखा रिठद यांनी केले आहे.

# वाचन संस्कृतीला नवी दिशा देणारा जिल्हा ग्रंथालयाचा अभिनव उपक्रम

## जिल्हा ग्रंथालयासाठी आवडीची उपयुक्त प्रेरणादायी पुस्तके सुचवावीत ;जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**वाशिम :** २४ डिसेंबर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहाच्या पाठीमागे, सिव्हिल लाईन कडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुसज्ज जिल्हा ग्रंथालय आहे. जिल्हा ग्रंथालयात जवळपास ६० हजार पुस्तके उपलब्ध आहेत. (https://eg4.nic.in/OPAC/Default.aspx?CL_NAME=DOLMH) या लिंकवर क्लिक केल्यास वाशिम जिल्हा निवड करून ग्रंथालयात असलेल्या पुस्तकाची यादी बघता येते.

जिल्ह्यामध्ये वाचन संस्कृतीस चालना मिळावी यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहवाचन संस्कृतीचा प्रसार, ज्ञानवृद्धी आणि समाजाच्या बौद्धिक विकासासाठी ग्रंथालये ही अत्यंत महत्त्वाची केंद्रे आहेत. बदलत्या काळात वाचकांच्या आवडी-निवडी, अभ्यासाच्या गरजा आणि ज्ञानाच्या क्षेत्रात होणारे नवनवीन बदल लक्षात घेऊन ग्रंथसंपदा अद्ययावत करता येते. या उद्देशाने वाचकांकडून त्यांच्या अवाडीच्या पुस्तकांना सुचविण्याचा नविन उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हा ग्रंथालयामध्ये वरील या दिव्यतिरिक्त वाशिम जिल्ह्यातील रसिक वाचकांची आवडीची, उपयुक्त व प्रेरणादायी पुस्तके अजून जास्त संख्येने उपलब्ध करून देण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. तरी या गूगल फॉर्मद्वारे जिल्ह्यातील साहित्यप्रेमी नागरिक, विद्यार्थी तसेच सर्व वयोगटातील वाचकांनी त्यांना अपेक्षित असणारी दर्जेदार पुस्तके सुचवावीत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. ज्या पुस्तकांसाठी जास्त वाचकांची पसंती असेल आणि शासकीय निकषानुसार शक्य असेल अशी जास्तीत जास्त नवीन पुस्तके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. ग्रंथालयासाठी पुस्तक प्रस्तावासाठी (https://tinyurl.com/washimlibrary) या लिंक वर क्लिक करुन किंवा सोबत दिलेला ण्दा स्कॅन करुन देखील पुस्तकाचे नाव नोंदविता येईल. हा गुगलफॉर्म ग्रंथालयासाठी वाचकांकडून पुस्तकांच्या सूचना / प्रस्ताव गोळा करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. कृपया पुस्तक सुचविताना पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव, पुस्तकाविषयी चार शब्द ही माहिती अचूक व पूर्णपणे नमूद करावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. ता प्र

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# शिक्षणमहर्षी व भारताचे पहीले कृषिमंत्री भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी

रिसोडः उत्तमचंद बगडिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रिसोड येथे मराठी विभागाच्या वतीने शिक्षणमहर्षी व भारताचे पहिले कृषिमंत्री भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. पी. के. नंदेश्वर होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये भाऊसाहेब देशमुख हे नवसृष्टीचे भाग्यविधाते असल्याचे गौरवोद्गार काढले. शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण विद्यालये, वस्तीगृहे, अनाथालय, व्यायामशाळा तसेच विधी व कृषी शाखांसह अनेक शैक्षणिक उपक्रम त्यांनी उभे केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख वक्ते प्रा. विठ्ठल वाघ यांनी आपल्या मार्गदर्शनात भाऊसाहेब कृषिमंत्री असताना त्यांनी राबविलेल्या महत्त्वपूर्ण कार्याचा वेध घेतला. विशेषतः



कर्जलवादाचा कायदा हा शेतकऱ्यांसाठी ईश्वरी वरदान ठरल्याचे ते म्हणाले. या कायद्यामुळे कर्जबाजारीपणामुळे शेतीवर येणारे संकट दूर होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. एम. पी. खेडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुमित लाव्हरे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. संदीप जुनघरे यांनी केले.

कार्यक्रमाला एनएसएस प्रमुख प्रा. डॉ. ए. जी. वानखेडे, प्रा. टिकार, प्रा. डॉ. मेश्राम, प्रा. बुधवंत, प्रा. बाजड, प्रा. राऊत, प्रा. पाठक मॅडम, प्रा. राम जुनघरे, प्रा. साबळे, प्रा. बोंडे मॅडम, प्रा. पांढरे यांसह प्राध्यापकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ओकार पूरी, डॉ. नरवाडे, प्रा. मनवर, प्रा. प्रजापती, डॉ. काळे, गोपाल कोल्हे, संतोष घुगे, सुनील चराटे, सुरज नरवाडे यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (वि. प्र)

# कोयाळी (बु )येथे २ जानेवारी रोजी भव्य समाज प्रभोधनाचे आयोजन




रिसोड - रिसोड :- भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध खंजेरी वादक सत्यपाल महाराज यांचे शिष्य पवन पाल महाराज यांचे दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी भव्य समाज प्रबोधनाचे आयोजन करण्याचे योजले आहे ,गावातील व पंचक्रोशीतील सर्व समाज बांधवांनी या समाज प्रबोधन कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी कोयाळी ( बु) यांनी केले आहे, हार्मोनियम वादक गायणाचार्य प्रभाकर दादा हिवराळे, तबलावादक राधेश्याम दादा खडसे, गायनाचार्य वाकोडे, अंकुश दादा घावट, उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे स्थळ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ कोयाळी (बु) ता. रिसोड,जि. वाशिम येथे ठरले असून दि. ०२ जानेवारी रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता हजारोच्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी कोयाळी (बु )यांनी केले आहे

# रिसोड उपनगराध्यक्षपद शिंदेसेनेकडे!

रिसोड, ता. २९ : वाशीम जिल्ह्याची राजकीय राजधानी असलेल्या रिसोड शहराच्या नगराध्यक्षपदी भाजपचे भगवानराव क्षीरसागर हे निवडून आल्यानंतर आता उपनगराध्यक्षपद हे अर्थातच युतीधर्म प्रामाणिकपणे पाळणाऱ्या आ.भावना गवळी यांच्या शिवसेना पक्षाला मिळणार असल्याचे बोलल्या जात आहे. आता भावना गवळी आपल्या निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी कोणाची वर्णी लावतात हे येत्या काही दिवसांत ठरणार आहे.

रिसोड नगराध्यक्षपदाचा उमेदवार हा जनतेतून निवडला. नगराध्यक्ष

**असे आहे पक्षीय बलाबल**

- भाजप - एक नगराध्यक्ष, नऊ नगरसेवक
- काँग्रेस - आठ नगरसेवक
- शिवसेना - पाच नगरसेवक
- अपक्ष - एक नगरसेवक
- एकूण - २३ नगरसेवक

म्हणून भगवानराव क्षीरसागर यांना हा मान मिळाला, तर यामधे उबठाचे सुधाकर देशमुख यांनी देखील चांगली टक्कर दिली. मात्र, त्यांना यश मिळू शकले नाही. रिसोड नगरपरिषदेवर मागील दोन दशकांपासून माजी खासदार अनंतराव देशमुख यांचेच वर्चस्व राहिले आहे.

आता ते भारतीय जनता पक्षात गेल्याने पक्षाचा प्रथमच नगराध्यक्ष शिवसेनेच्या आ.भावना गवळी यांच्या सहकार्याने विराजमान झाले आहेत. आता उपाध्यक्षपद हे शिवसेनेकडे जाणार असल्याचे शिवसेनेचे पाच नगरसेवक निवडून आले असून, यामध्ये माजी नगरसेवक तथा माजी सभापती दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आलेले नगरसेवक संतोष चराटे यांचे नाव आघाडीवर आहे.

दुसरीकडे नव्याने निवडून आलेले विष्णू जाधव यांना देखील संधी मिळू शकते. मात्र, असे असले तरी शिवसेनेच्या सर्वेसर्वा आ.भावनाताई गवळी यांचा निर्णय शिरसावंद्य मानला जातो.

# कृषी महाविद्यालयात संविधान दिन



रिसोडः : -डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलग्निक कृषी महाविद्यालय रिसोड येथे २६ डिसेंबर २०२५ वीर बाल दिनाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आशिष अत्तुरकर तर विशेष निमंत्रित व प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री राजेश डवरे शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिम यांची उपस्थिती लाभली शिखांचे दहावे गुरु गुरुगोविंदसिंगजी यांचे बालवीर पुत्र जोरावरसिंह व फतेहसिंह यांचे सत्य व धर्मासाठी च्या बलिदानाच्या वीर कृत्याच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित या दिनामध्ये डॉ आशिष आपतुरकर व राजेश डवरे यांनी आपले मार्गदर्शनामध्ये वीर बाल दिनाचे महत्त्व अधोरेखांकित करताना बालविरांच्या आठवणीला उजाळा दिला याप्रसंगी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु श्रद्धा रंजवे कु रिया थोराईत शुभम हुलगुंडे शेळके कु अचल इंगळे यांनी सुद्धा वीर बाल दिनाबद्दल आपले मनोगत व भावना व्यक्त केल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा एल बी काळे स्पोर्ट प्राध्यापक कृषी महाविद्यालय रिसोड यांनी केले या कार्यक्रमासाठी प्रा विठ्ठल बोडके प्राध्यापक डी टी बोरकर प्रा गणेश हरणे प्रा शेख प्रा माने सर यांच्यासह बहुतांश कर्मचारी वृंद व विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण कृषी महाविद्यालय चमु यांनी अथक परिश्रम घेतले(वि. प्र)

# स्व.मायादेवी बगडीया यांचे मरणोत्तर नेत्रदान



रिसोड: येथील रहिवासी अशोककुमार बगडीया (नगरसेठ) यांची पत्नी स्व. मायादेवी अशोकुमार बगडीया यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षी दिनांक २४ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता निधन झाले. त्यांच्या मागे बराच मोठा आप्त परिवार आहे तसेच संपुर्ण बगडीया कुंटुबातील आधारस्तंभ तथा सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या तसेच समाजकार्याची आवड असलेल्या स्व. मायादेवी अशोककुमार बगडीया यांचे निधन झाल्याने संपुर्ण बगडीया कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा असताना बगडीया कुंटुबीयांनी एवढया दुखामध्येही मुत्यनंतर दोन अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त करत एक आदर्श निर्माण केला.

त्यानूसार जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्र शल्यचिकित्सक, डॉ. आशिष बेदरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र चिकित्सा अधिकारी ज्ञानेश्वर पोटफोडे व नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे, ओम राऊत यांनी स्व. मायादेवी अशोककुमार बगडिया यांची नेत्र बुबुळे काढली व नेत्र बुबूळे त्याच दिवशी वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. तरी या नेत्रांच्या सहायाने दोन दृष्टि हिनांना पुन्हा प्रकाश पाहण्याची संधी उपलब्ध होणार असून बगडीया कुटुबिंयाच्या निर्णयाचे सर्वत्र कौतूक होत आहे. कुटूबिंयानी जनतेला संदेश देताना सांगितले की, नेत्रदान हि अत्यंत पवित्र व मानवतावादी कृती असुन, मृत्युनंतरही एखादयाच्या आयुष्यात प्रकाश देण्याची संधी यातुन मिळते. भारतात दरवर्षी हजारो लोक नेत्र मिळण्याच्या प्रतिक्षेत असतात. सदरील नेत्रदान करण्याकरीता त्यांची मुले शिवकुमार बगडीया, महेश बगडीया, राजेश्वर बगडीया, मुलगी योगीता सुन मनिषा बगडीया नातवंड हर्षली, खुशी, रुद्रांश बगडीया तसेच अरुनकुमारजी बगडीया, डॉ. बगडे व समस्त बगडीया कुंटुबांचे सहकार्य लाभले. मृत्यूनंतर जवळच्या व्यक्तीचे त्वरीत नेत्रदान घडवून आणावे व नेत्रदाना नंतरच मृतावर अंतिम संस्कार करावे असे अवाहन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. अनिल कावरखे यांनी केले असुन बगडीया कुटूंबाचे आभार मानले आहेत.

# जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना १२ तासांत अटक



## रिसोड पो. स्टे. ची उल्लेखनिय कामगिरी

रिसोडः फिर्यादी अमोल प्रकाश खिल्लारे, वय २८ वर्षे, व्यवसाय शेती, रा. पुसेगाव, ता. सेनगाव, जि. हिंगोली यांनी पोलीस स्टेशन रिसोड येथे रिपोर्ट दिला होता की, २३ डिसेंबर रोजी रात्री ०९.०० वा. चे सुमारास सेनगाव रोडवरील घोन्सर फाट्याजवळ दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना मारहाण करूनत्यांची १) एक हिरो स्प्लेंडर प्लस कंपनीची मोटार किं. ९७,०००/- रू., २) नगदी ७०००/- रू. व ३) एक रेडमी कंपनीचा मोबाईल किं.अं. १०,०००/- रू. असा एकूण १,१४,०००/- रू. चा मुददेमाल जबरीने चोरून घेवून गेले आहेत. अशा फिर्यादवरून दोन अनोळखी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयातील अनोळखी आरोपींचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना पोलीस स्टेशन रिसोडचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी डी. बी. पथकास दिल्या होत्या. त्यानंतर डी. बी. पथकातील अधिकारी / अंमलदार यांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक पध्दतीच्या माध्यमातून व गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीवरून आरोपीचा शोध घेतला व सदर गुन्हयात दोन आरोपींना सेनगाव रोडवरील फुटाणा फॅक्टरी परिसरातून ताब्यात घेवून गुन्हयासंबंधाने सखोल विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबूली दिली व त्यांचेकडून गुन्हयात चोरीस गेलेली एक हिरो स्प्लेंडर प्लस कंपनीची मोटार किं. ९७,०००/- रू. जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे. पोलीसअधीक्षक अनुजतारे अपरपोलीसअधीक्षक श्रीमतीलता फड, सहायक पोलीस अधीक्षक, वाशिम नवदिप अग्रवाल यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वाखाली डी.बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस हवालदार श्रीकिसन नागरे, मनोहर वानखेडे, पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे यांनी केली आहे. ता.प्र.

